ठाणे, शुक्रवार दि. २१ जून २०२४ वर्ष : १३, अंक : ५४ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख
**नीट परीक्षा पेपरफुटी**
स्पर्धात्मक परीक्षेला अनेक युवक बसतात, परंतु पेपरफुटीच्या वाढत्या प्रकारणांमुळे प्रामाणिक व अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे दिसते. आता नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे उघडकीस आले आहे.
.....पान २ वर



**मधुमेही व्यक्तीने बटाटा खाणे सोडावे का?**
...पान ३ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

| कमाल | किमान |
|---|---|
| ३६° से | २९° से |

**बाजार**

| सोने | चांदी |
|---|---|
| ७२,५५० | ९३,५०० |

**डोकं खाजवा** –अशोक सुतार




# मोदी युध्द थांबवू शकतात, पण पेपरफूटी थांबवू शकत नाही

नवी दिल्ली : पेपर लीक प्रकरणावरून काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्रातील एनडीए सरकारवर हल्लाबोल केला. पीएम मोदी पेपर लीक थांबवू शकत नाहीत. दोषींवर कठोर कारवाई करावी. प्रामाणिक विद्यार्थ्यांची फसवणूक झाली असून छएएढ चा पेपर लीक झाल्याचे ते म्हणाले. NEET आणि UGC-NET पेपर लीक प्रकरणावर, काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी हा मुद्दा संसदेत उपस्थित करू, असे सांगितले. मोदींनी युक्रेनमधील युद्ध थांबवल्याचे बोलले जात होते. इस्रायल आणि गाझा यांच्यातील युद्धही नरेंद्र मोदींनी थांबवले होते. पण कुठल्या ना कुठल्या कारणाने नरेंद्र मोदी भारतात पेपरफुटीचे प्रकार थांबवू शकत नाहीत किंवा थांबवू इच्छित नाहीत, अशा शब्दात राहुल यांनी मोदींवर तोफ डागली.

## शैक्षणिक संस्था आरएसएस-भाजपच्या ताब्यात- राहुल गांधी



## NEET UG समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार

गुरुवारी झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने NEET UG समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार दिला आहे. अंतिम सुनावणीनंतर परीक्षा रद्द झाल्यास समुपदेशनही रद्द करण्यात येईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. यापूर्वी ११ जून रोजीही सर्वोच्च न्यायालयाने हे अपील फेटाळले होते. परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या नव्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयातही सुनावणी झाली. ४९ विद्यार्थी आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) यांनी ही याचिका दाखल केली आहे. यावर पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे. याचिकाकर्त्यांनी परीक्षेत ६२० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी तपासण्याची आणि फॉरेन्सिक तपासणीची मागणी केली आहे. त्याचबरोबर पेपरफुटीच्या आरोपाच्या सीबीआय चौकशीचीही मागणी करण्यात आली आहे. यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने (पान २ वर)



# ठाणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस...
## सखल भागात साचले पाणी


उाणे – जिल्ह्यात गुरुवारी पहाटेपासून मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला आहे. या पावसामुळे अनेक भागांमध्ये पाणी साचले होते. ठाणे शहरात सकाळी ८.३० ते ९.३० या एक तासाच्या कालावधीत २६.४२ मिमी पाऊस पडला असल्याची नोंद ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाकडे करण्यात आली आहे. जून महिना सुरू होऊन पंधरा दिवस उलटून गेले तरी शहरात पुरेशा प्रमाणात पावसाने हजेरी लावली नव्हती. यामुळे वातावरणातही उकाडा कायम होता. या उकाड्याने नागरिक देखील हैराण झाले होते. परंतु जिल्ह्यात बुधवारपासून पावसाने हजेरी लावल्यामुळे वातावरणात निर्माण झालेल्या गारव्याने नागरिकांना दिलासा मिळाला.

आज गुरुवारी पहाटेपासून पाऊस पडायला सुरुवात झाली. यामुळे सकाळी कामाला जाणाऱ्या नागरिकांची तसेच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची चांगलीच (पान २ वर)



भिवंडीत सुरू असलेल्या पावसाने अनेक सखल भागात पाणी साचले आहे.

### पावसामुळे पोलीस शिपाई भरतीला ब्रेक...



(छाया-मनोज सिंह)

ठाणे शहर पोलीस दलाच्यावतीने १९ जूनपासून ६८६ पदासांठी राबविण्यात येत असलेली पोलीस शिपाई भरती पावसामुळे तुर्तास थांबवण्यात आली. ठाण्यातील साकेत पोलीस मैदानात पाणीच पाणी झाल्याने भरतीसाठी आलेल्या उमेदवारांच्या मैदानी चाचणीवर पाणी फेरले. (सविस्तर वृत्त पान २ वर)



ठाण्यात संततधार पडणाऱ्या पावसामुळे कापुरबावडी नाका येथे पाणी साचले. (छाया : मनोज सिंह)

**थोडक्यात घडामोडी**

### बिहारमधील ६५ आरक्षणाचा निर्णय रद्द

मुंबई – बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांना मोठा झटका बसला आहे. बिहारमध्ये नीतिश कुमार सरकारने आरक्षणाची मर्यादा ५० टक्क्यांवरून ६५ टक्के केली होती. कोर्टाने राज्य सरकारचा हा निर्णय रद्द ठरवला आहे. त्यामुळे नीतीश कुमार सरकारला मोठा झटका बसला आहे. तर, महाराष्ट्रातही आरक्षणाची मर्यादा वाढवण्याची मागणी मराठा आरक्षणानंतर जोर धरू लागली होती. त्यामुळे महाराष्ट्रालाही आता कोर्टाच्या या निर्णयाने टेन्शन येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. (पान २ वर)

**महाराष्ट्राला टेन्शन?**
राज्यात ओबीसी, मराठा आणि धनगर समाजाने आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. त्यासाठी उपोषणं सुरू आहेत. आपल्या कोट्यातून दुसऱ्यांना आरक्षण देऊ नये अशी भूमिका ओबीसींनी घेतली आहे. त्यामुळे मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिलं तर ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली जाईल. त्याला कोर्टात आव्हान दिलं गेलं तर आरक्षण टिकणार नाही, अशी चर्चा असतानाच पटना न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे महाराष्ट्राचं टेन्शन वाढलं आहे. आरक्षणाची मर्यादा वाढवावी की वाढवू नये? असा संभ्रम आता निर्माण होण्याची शक्यता असल्याचं सांगितलं जात आहे.

**नाले तुंबून नागरिकांच्या घरात पाणी अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करा**
(सविस्तर वृत्त पान ४ वर)







गुरुवारी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी ठाण्यातील काँग्रेसचे दिवंगत सचिन शिंदे यांच्या घरी जावून त्यांच्या परिवाराची सांत्वना केली. तसेच कोकण पदवीधर मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश किर यांच्या प्रचारार्थ ठाण्यातील एन. के. टी. सभागृहात आयोजित सभेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सभेला आमदार जितेंद्र आव्हाड, माजी खासदार राजन विचारे व महाविकास आघाडीचे नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छाया – मनोज सिंह)

# ठाणे शहरातील शाळांमधूनही निरंजन डावखरे यांना प्रतिसाद



ठाणे – ठाणे शहरातील पदवीधर तरुण-तरुणींबरोबरच विविध शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडून आमदार निरंजन डावखरे यांना प्रतिसाद मिळत आहे. गेल्या १२ वर्षांत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करण्याबरोबरच विविध कार्याला नागरिकांकडून पसंती मिळत आहे.

आमदार निरंजन डावखरे यांच्यासह भाजपाचे माजी नगरसेवक सुनेश जोशी, माजी नगरसेविका प्रतिभा मढवी, जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेश मढवी, कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे अध्यक्ष सचिन मोरे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये नुकताच संपर्क साधण्यात आला. तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना केलेल्या कार्याची व भविष्यातील संकल्पाची माहिती देण्यात आली. नौपाडा येथील सरस्वती स्कूल, शिवसमर्थ विद्यामंदिर, चरई येथील मावळी मंडळ, (पान २ वर)

# ठाणे जि.प. वाढवणार कन्या शाळेची पटसंख्या – रोहन घुगे

ठाणे : शहरातील ऐतिहासिक, ब्रिटीश कालीन कन्या शाळेची पटसंख्या कमी झालेली आहे. त्यामुळे ही शाळा बी.जे. हायस्कूलमध्ये समाविष्ठ करून मुलींना शिक्षण दिले जात आहे. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या या शाळेकडे लक्ष देऊन पटसंख्या वाढवणाचे सुतोवाच मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी पत्रकारांशी बोलताना स्पष्ट केले. जिल्हा परिषदेचे सीईओ पद गेल्या काही महिन्यांपासून रिक्त होते. हा पदभार स्विकारल्यानंतर सीईओंनी सदिच्छा भेट घेण्यासाठी आज पत्रकार परिषद धेतली. त्यात कन्या शाळेच्या विषयावर चर्चा झाली. ब्रिटीश कालीन कन्या शाळेची पटसंख्या वाढवून तिची भरभराट करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सीईओ यांनी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यालयाजवळ असलेली ही कन्या शाळा पटसंख्ये अभावी बी.जे. हायस्कूलमध्ये समाविष्ठ करण्याचे प्रयत्न सुरू आहे. ग्रामीण भागातील शाळांची पटसंख्या वाढवण्यात आल्याचा गवगवा करणाऱ्या प्राथमिक शिक्षण विभागाला जवळच्या कन्या शाळेची पटसंख्या वाढवता आली नाही, याकडे सीईओ यांचे लक्ष वेधले असता या कन्या शाळेची पटसंख्या नक्कीच वाढण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. शहरात आधीच खासगी शाळांचे पेव फुटले आहे. त्यातील महागड्या शिक्षणाची संधी शहरातील चाळ्या, झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलींना मिळणार नाही.



(छाया-मनोज सिंह)

पण जिल्हा परिषदेच्या या कन्या शाळेत शिक्षणाची उत्तम संधी असतानाही पटसंख्ये अभावी ही शाळा शेवटच्या घटका मोजत आहे. शहरातील या शाळेला पुनर्जिवीत करण्याची गरज पत्रकारांनी व्यक्त करून ऐतिहासिक ठेवा जिवीत ठेवण्याची अपेक्षा सीईओ यांच्याकडे करण्यात आली. त्यास अनुसरून त्यांनी पटसंख्या वाढणार असल्याचे सुतोवाच केले. वर्धा येथील जिल्हा परिषदेच्या शाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढवून तृतिय क्रमांकावर आणल्यामुळे सीईओ यांना केंद्र शासनाने पुरस्कार देऊन सन्मानित केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यासअ नुसरून येथील जिल्हा परिषदेच्या कन्या शाळेला पुनर्जिवीत करण्याची अपेक्षा त्यांच्याकडे करण्यात आली. त्यास त्यांनी सहमती दर्शवली.

## देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन फिरणाऱ्या आरोपीला मानपाडा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

डोंबिवली :कल्याण डोंबिवली शहरामध्ये बेकायदेशीर रित्या पिस्तूल खिशात ठेवून खुलेआमपणे फिरणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होताना दिसतेय . एकीकडे शहरात गुन्हेगारीचे प्रमाण वाढत असतानाच दुसरीकडे मात्र अवैधरीत्या शहरात पिस्तुलांची तस्करी होण्याचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाहीये. डोंबिवलीत पुन्हा असाच एक प्रकार समोर आलाय गावठी बनावटीचा पिस्तूल सहा काडतुसे घेऊन फिरणाऱ्या एका इसमाला मानपाडा पोलिसांनी सापळा रचत अटक केली आहे मानपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना माहिती मिळाली होती की डोंबिवली शहरांमध्ये एक इसम संशयितरित्या फिरताना दिसतोय त्यानंतर तत्काळ गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या अधिकाऱ्यांनी याची माहिती घेऊन घटनास्थळ गाठले त्या ठिकाणी गेल्यावर अधिकाऱ्यांचा संशय बळावला पोलिसांनी त्या इसमाला ताब्यात घेतलं. या इसमाची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी बनावटीचे पिस्तूल, सहा काडतुसं आणि दोन मोबाईल आढळून आले. (पान २ वर)

### शिवराज्याभिषेक दिन...



ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी शके १९४६, गुरुवार २० जून रोजी ३५१व्या श्री शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने ठाणे महापालिकेतर्फे मासुंदा तलाव येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यावेळी, राज्याभिषेक समारोह संस्था, ठाणे यांच्यावतीने कलाकारांनी पोवाडे सादर केले. तर, ठाणे महापालिकेच्या अग्निशमन दलाच्या बॅण्ड पथकाने महाराष्ट्र गीताची सलामी दिली. याप्रसंगी, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, उपायुक्त (परिमंडळ २) शंकर पाटोळे, नौपाडा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिन तडवी, माजी ज्येष्ठ नगरसेवक संजय वाघुले, राज्याभिषेक समारोह संस्थेचे शंतनू खेडकर आदी उपस्थित होते. त्यानंतर, कळवा नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी, उपायुक्त (परिमंडळ २) शंकर पाटोळे, नौपाडा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त सोपान भाईक, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यासिन तडवी, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर उपस्थित होते.

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## नीट परीक्षा पेपरफुटी

स्पर्धात्मक परीक्षेला अनेक युवक बसतात, परंतु पेपरफुटीच्या वाढत्या प्रकारणांमुळे प्रामाणिक व अभ्यासू विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचे दिसते. आता नीट परीक्षेत पेपरफुटी झाल्याचे उघडकीस आले आहे. याचिकाकर्त्यांनी परीक्षेत ६२० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी तपासण्याची आणि फॉरेन्सिक तपासणीची मागणी केली आहे. पेपरफुटीच्या आरोपाच्या सीबीआय चौकशीचीही मागणी करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाने नीट युजीसी समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार दिला आहे. अंतिम सुनावणीनंतर परीक्षा रद्द झाल्यास समुपदेशनही रद्द करण्यात येईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. यापूर्वी ११ जून रोजी सर्वोच्च न्यायालयाने हे अपील फेटाळले होते. परीक्षा रद्द करण्याची मागणी करणाऱ्या नव्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात नुकतीच सुनावणी झाली. ४९ विद्यार्थी आणि स्टुडंट फेडरेशन ऑफ इंडिया यांनी ही याचिका दाखल केली आहे. यावर पुढील सुनावणी ८ जुलै रोजी होणार आहे.

काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला आहे. काँग्रेसने आरोप केला आहे की, पंतप्रधान दरवर्षी परीक्षेची चर्चा करण्याचा भव्य तमाशा करतात, परंतु असे असूनही ते लीक किंवा फसवणूक केल्याशिवाय परीक्षा घेऊ शकत नाहीत. काँग्रेसची विद्यार्थी संघटना एनएसयूआयनेही परीक्षा रद्द करण्याबाबत दिल्लीत निदर्शने केली. याचिकाकर्त्यांनी परीक्षेत ६२० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी तपासण्याची, पेपरफुटीच्या आरोपाच्या सीबीआय चौकशीची आणि फॉरेन्सिक तपासणीची मागणी केली आहे. यासोबतच सर्वोच्च न्यायालयाने नीट युजीसी प्रकरणी राजस्थान, कलकत्ता आणि मुंबई उच्च न्यायालयांमध्ये दाखल केलेल्या याचिकांना एकत्र केले आहे. आता ८ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात यावर सुनावणी होणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) ही मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्या. एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे. सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी नीट समुपदेशनाला स्थगिती देण्यास नकार दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने नॅशनल टेस्टिंग एजन्सी म्हणजेच एनटीए, परीक्षा आयोजित करणाऱ्या संस्थेला या प्रकरणी नोटीस बजावली होती. नीट युजीसीच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून याचे उत्तर हवे असल्याचे न्यायालयाने म्हटले होते. ही याचिका विद्यार्थी शिवांगी मिश्रा आणि इतर ९ विद्यार्थ्यांनी निकाल जाहीर होण्यापूर्वी १ जून रोजी दाखल केली होती. यामध्ये बिहार आणि राजस्थानच्या परीक्षा केंद्रांवर चुकीच्या प्रश्नपत्रिका वाटल्याने अनियमितता झाल्याची तक्रार करण्यात आली असून परीक्षा रद्द करून एसआयटी तपास करण्याची मागणी करण्यात आली आहे. युजीसी – नेट परीक्षेत पेपरफुटी झाल्यामुळे अनेक विद्यार्थी व पालक संतप्त झाले आहेत. अभ्यासू व प्रामाणिक मुलांची मेहनत पेपरफुटी प्रकरणामुळे वाया जात आहे. केंद्र सरकार याची दखल दाखल कधी घेणार असा सवाल पालक व विद्यार्थी करत आहेत. केंद्र सरकारने दि. १९ जून रोजी होणारी युजीसी – नीट परीक्षा रद्द केली होती. ही परीक्षा एक दिवस आधी १८ जूनला घेण्यात आली होती. शिक्षण मंत्रालयाचे सहसचिव गोविंद जैस्वाल यांनी नुकतेच म्हटले आहे की, आम्हाला युजीसी – नीटमधील अनियमिततेची कोणतीही तक्रार आलेली नाही, परंतु विद्यार्थ्यांचे हित जपण्यासाठी आम्ही स्वतःहून दखल घेतली आहे. जैस्वाल म्हणाले की, आम्हाला परीक्षेतील अनियमिततेची माहिती मिळाली होती, त्या आधारे आम्ही ती रद्द करण्याचा निर्णय घेतला. आम्ही त्याचे तपशील सार्वजनिक करू शकत नाही. या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे सोपवण्यात आला आहे. आता पुनर्परीक्षेची तारीख लवकरच जाहीर केली जाईल. जैस्वाल यांच्या म्हणण्याप्रमाणे पुनर्परीक्षा घेतली जाईलही ! परंतु विद्यार्थ्यांच्या विश्वासार्हतेला गेलेला तडा कसा भरून काढणार असा प्रश्न उरतो. काँग्रेस नेते राहजल गांधी यांनी याप्रकरणी म्हटले आहे की, पंतप्रधान नरेंद्र मोदी पेपर लीक थांबवू शकत नाहीत. त्यांनी या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी. सादर घडलेल्या घटनेमुळे प्रामाणिक विद्यार्थ्यांची फसवणूक झाली असून नीटचा पेपर लीक झाल्याचे ते म्हणाले. नीट आणि युजीसी – नेट पेपर लीक प्रकरणावर, काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी हा मुद्दा संसदेत उपस्थित करू, असे म्हटले आहे. मोदींनी युक्रेनमधील युद्ध थांबवल्याचे बोलले जात होते. इस्रायल आणि गाझा यांच्यातील युद्धही नरेंद्र मोदींनी थांबवले होते. पण कुठल्या ना कुठल्या कारणाने नरेंद्र मोदी भारतात पेपरफुटीचे प्रकार थांबवू शकत नाहीत किंवा थांबवू इच्छित नाहीत, अशा शब्दात राहुल यांनी मोदींवर तोफ डागली. सरकारवर टीका केल्याने झालेली हानी भरून येणार नाही, परंतु सदोष व्यवस्था सुधारता येईल अशी अपेक्षा केंद्र सरकारकडून करायला हरकत नाही. आता नीट पेपरमधील घोटाळा समोर आला आहे. त्यामुळे नीट – युजीसी परीक्षा रद्द करण्यात आली आहे. काँग्रेसने आरोप केला आहे की, पेपरफुटीमागे शिक्षण व्यवस्थेला भाजपच्या पालक संघटनेने काबीज केले आहे. जोपर्यंत तो पूर्ववत होत नाही तोपर्यंत पेपरफुटी सुरूच राहणार आहे. मोदीजींनी हे होऊ दिले आहे, जे देशविरोधी कृत्य आहे. नीट – युजीसी परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी देशभरात निदर्शने होत आहेत. लखनौ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी याप्रकरणी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने नीट युजीसी समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार दिला आहे. परंतु नेमके कोणाचे समुपदेशन करायचे ? परीक्षा घेणाऱ्याचे की देणारयांचे हा विषय आता चर्चेस येत आहे. पेपरफुटीमागे कोणती विषवल्ली आहे, त्याची पाळेमुळे खणून विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या संकटापासून मुक्त केले पाहिजे, असे वाटते. तरच भावी नागरिक घडतील आणि देश सुधारेल, असे वाटते.

### मोदी युध्द थांबवू शकतात, पेपरफूटी थांबवू शकत नाही– राहुल गांधी

**(पान १ वरून) शैक्षणिक संस्था आरएसएस–भाजपच्या ताब्यात** – ते म्हणाले की, बिहारबाबत आमचा मुद्दा असा आहे की, पेपर लीक करणाऱ्यांवर चौकशी झाली पाहिजे आणि कारवाई झाली पाहिजे. शैक्षणिक संस्था आरएसएस–भाजपच्या ताब्यात आहेत आणि हे बदलल्याशिवाय पेपरफुटी थांबणार नाही, असे राहुल गांधी म्हणाले. भारत जोडो न्याय यात्रेदरम्यान हजारो लोकांनी पेपर फुटल्याची तक्रार केली होती. NEET, UGC NET चे पेपर लीक झाले, णत्रछ–छएढ परीक्षा रद्द. हा व्यापमचा देशाच्या इतर भागात विस्तार आहे. पेपरफुटीचा मुद्दा आम्ही संसदेत उपस्थित करू.

ते पुढे म्हणाले की, 'भारत जोडो यात्रेदरम्यान हजारो तरुणांनी पेपरफुटीच्या तक्रारी केल्या होत्या. आता छएएढ पेपरमधील घोटाळा समोर आला आहे. NET-UGC रद्द करण्यात आले आहेत. पेपरफुटीमागे शिक्षण व्यवस्थेला भाजपच्या पालक संघटनेने काबीज केले आहे. जोपर्यंत तो पूर्ववत होत नाही तोपर्यंत पेपरफुटी सुरूच राहणार आहे. मोदीजींनी हे होऊ दिले आहे, जे देशविरोधी कृत्य आहे. NEET UG परीक्षा रद्द करण्याच्या मागणीसाठी देशभरात निदर्शने होत आहेत. लखनौ विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे.

### NEET UG समुपदेशनावर बंदी घालण्यास पुन्हा नकार–

**(पान १ वरून)** NEET UG प्रकरणी राजस्थान, कलकत्ता आणि मुंबई उच्च न्यायालयांमध्ये दाखल केलेल्या याचिकांना एकत्र केले आहे. आता ८ जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात यावर सुनावणी होणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) ही मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती एसव्हीएन भट्टी यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी सुरू आहे.

### ठाणे जिल्ह्यात मुसळधार पाऊस

**(पान १ वरून)** तारांबळ उडाली होती. ठाणे शहरात सकाळी ८.३० ते ९.३० या कालावधीत २६.४२ मिमी पाऊस पडला. यामुळे शहरातील पेढ्या मारुती रोड, वंदना बस डेपो जवळ पाणी साचले होते. जिल्ह्यातील डोंबिवली, कल्याण, भिवंडी, उल्हासनगर, बदलापूर तसेच ग्रामीण भागात देखील मुसळधार पाऊस पडत आहे. कल्याण डोंबिवली शहरात सखल भागात पाणी साचल्यामुळे रिक्षा चालकांना वळसा घेऊन प्रवास करावा लागत आहे. तसेच रेल्वे स्थानक परिसरातही पाणी साचल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. नाले सफाईची काम योग्य रीतीने झाली नसल्यामुळे शहराच्या अंतर्गत भागातील रस्ते पाण्याखाली गेले आहेत.. काही भागात विजेचा लपंडाव सुरू आहे. कल्याण शहरात शिवाजी चौक, खडकपाडा, गांधारी, टिटवाळा आणि २७ गावातील अनेक भागात पाणी साचले आहे. अंबरनाथ, बदलापूरसह आसपासच्या भागात गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास पावसाला सुरुवात झाली. सुरुवातीला रिमझीम असलेल्या पावसाने अर्धा तासात जोर धरला. पावसामुळे रस्ते आणि रेल्वे वाहतुकीचा वेग मंदावला. कल्याण बदलापूर रस्त्यावर सकाळी पाणी साचले नसले तरी वाहतूक संथगतीने सुरू होती. मात्र धरण क्षेत्रातही पाऊस होत असल्याने नागरिकांत समाधानेच वातावरण आहे.

मागील आठवडाभरापासून मोसमी पावसाची आगेकूच रखडली होती. पावसाचा जोरही कमी झाला होता. मात्र, आता अरबी समुद्रावरून येणाऱ्या नैऋत्य मोसमी पावसाचा जोर वाढला आहे. पुढील चार दिवस किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात चांगला पाऊस होण्याचा अंदाज आहे. राज्यात सहा जून रोजी दाखल झालेल्या मोसमी पावसाने दहा जूनपर्यंत राज्यात वेगाने प्रगती केली. दहा जून रोजी मोसमी पाऊस जळगाव, अकोला, चंद्रपुरात दाखल झाला. पण, त्यानंतर बुधवारपर्यंत (१९ जून) मोसमी पाऊस तिथेच रेंगाळला आहे. आता मोसमी पावसाची अरबी समुद्रावरील शाखा जोर धरत आहे. अरबी समुद्रावरून येणारे नैऋत्य मोसमी वारे वेगाने किनारपट्टीकडे येत आहेत. त्यामुळे पुढील चार दिवस संपूर्ण किनारपट्टीसह पश्चिम घाटाच्या परिसरात पावसाचा जोर वाढणार आहे. राज्याच्या अन्य भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान विभागाचे निवृत्त शास्त्रज्ञ डॉ. अनुपम कश्यपी यांनी व्यक्त केली आहे. हवामान विभागाने सिंधुदुर्गपासून ठाण्यापर्यंत संपूर्ण किनारपट्टीला पुढील चार दिवस पिवळा इशारा दिला आहे. पुढील चार दिवस मुंबईसह किनारपट्टीवर मध्यम ते जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज आहे. पश्चिम घाटाच्या परिसरात प्रामुख्याने पुणे, सातारा जिल्ह्यांत पावसाचा जोर राहणार आहे.

### ठाणे शहरातील शाळांमधूनही निरंजन डावखरे यांना प्रतिसाद

(पान १ वरून) श्रीरंग विद्यालय, माजिवडा येथील ग्रामीण शिक्षण संस्था हायस्कूल, वर्तकनगर येथील थिराणी हायस्कूल, घोडबंदर रोड येथील लोढा वर्ल्ड हायस्कूल या शाळांमध्ये सभा झाल्या. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

जग अत्यंत वेगाने बदलत असताना सरकारी शाळांमध्ये डिजिटल शिक्षण आवश्यक आहे. त्यादृष्टीकोनातून कोकणातील प्रत्येक शाळेत संगणक देण्यात आला. त्यातून प्रत्येक मुलाला अद्ययावत ज्ञान उपलब्ध होईल, याकडे लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यानुसार कोकणातील शेकडो शाळांना संगणक वाटप करण्यात आले आहे. विद्यार्थी घडविण्यात शिक्षकांची भूमिका महत्वाची असते. अशा गुणवंत शिक्षकांना प्रोत्साहन देण्यासाठी वसंत स्मृती पुरस्कार देण्यात आले, असे नमूद करून आमदार निरंजन डावखरे यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ठिकठिकाणी मोफत ई–ग्रंथालये सुरू करण्यात आली असल्याचे सांगितले. येत्या २६ जून रोजी होणाऱ्या निवडणुकीत माझ्या नावापुढे एक क्रमांक लिहून बहुमताने निवडून द्यावे, असे आवाहन आमदार डावखरे यांनी केले.

### देशी बनावटीचे पिस्तूल घेऊन फिरणाऱ्या आरोपीला मानपाडा पोलिसांनी ठोकल्या बेड्या

(पान १ वरून) एक लाख ३८ हजाराचा मुद्देमाल त्याच्याकडून हस्तगत करण्यात आला. अंकुश राजकुमार केशरवानी असं अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे त्याच्यावर मानपाडा पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आलाय.. या संदर्भात त्याने हे पिस्तूल कोणी व कशासाठी आणलं होतं याचा तपास पोलीस करत आहेत मात्र अवैधपणे पिस्तूल बाळगणाऱ्या इसमांना नेहमी अटक केली जाते पण हे पिस्तूल ते कशासाठी बाळगतात आणि त्याची तस्करी कशी केली जाते ते कुठून आणला जातो आणि कोणाला विकलं जातं हे प्रश्न कायमच गुलदस्तात राहिलेले आहेत.

### बिहारमधील ६५ आरक्षणाचा निर्णय रद्द

(पान १ वरून) पटना उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. बिहार सरकारने शिक्षण संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये एससी, एसटी, ईबीसी आणि इतर मागासवर्गांना मिळून ६५ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. या आरक्षणाला कोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. या याचिकांवर सुनावणी करताना कोर्टाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. याचिकाकर्ते गौरव कुमार आणि इतरांनी या याचिका दाखल केल्या होत्या. त्यावर सुनावणी झाल्यानंतर ११ मार्च रोजी निर्णय राखून ठेवण्यात आला होता. त्यावर आज निर्णय झाला आहे.




बिनशर्त नाही, बिनशर्ट पाठिंबा', उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंची खिल्ली उडवल्यानंतर ठाण्यात मनसैनिकांचे बॅनर बाजीतून प्रत्युत्तर... (छाया– मनोज सिंह)



### मध्यान जेवणाच्या स्वयंपाक घरात आयुक्तांची भेट...

ठाणे महापालिका शाळांतील १४ हजार विद्यार्थ्यांना दररोज माध्यान्न पोषण आहार देणाऱ्या अक्षयपात्र फाऊंडेशन या संस्थेच्या पवार नगर येथील स्वयंपाकघरास ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच भेट दिली. (सविस्तर वृत्त पान ४ वर)

### साकेत पोलीस भरतीला लागला ब्रेक

ठाणे – ठाण्याच्या शाखेत मैदानावर ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या वतीने मंगळवारी सुरू करण्यात आलेल्या पोलीस शिपाई आणि चालक या भरती प्रक्रिया दि.२१, २२ रोजी होणार असता गुरुवारी मुसळधार पावसाने मैदानात केलेल्या चिखलाने ब्रेक लागल्याचं माहिती पोलीस सूत्राने दिली याबाबत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे येत्या २६ जूनला ही परीक्षा घेण्याचे ठरविले गेले आहे, तसेच त्यासंबंधित सूचना एसएमएसद्वारे उमेदवारांना कळविण्यात येईल.

बुधवारपासून ठाण्याच्या शाखेत मैदानावर ६६६ पोलीस शिपाई आणि २० चालक भरतीची प्रक्रिया, मैदानी चाचण्या घेण्याची सुरुवात केल्यानंतर गुरुवारी ठाण्यात सकाळी ९–३० दरम्यान पडलेल्या मुसळधार पाऊसाने साकेत मैदानात पाणी आणि चिखल झाल्याने चाचण्यांसाठी आलेल्या उमेदवारांना नाईलाजास्तव परत जावे लागले. याबाबत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीप्रमाणे येत्या २६ जूनला ही परीक्षा घेण्याचे ठरविले गेले आहे, तथापि पावसाचे आगमन पुन्हा सुरू राहिल्यास तर त्यासंबंधित सूचना एसएमएसद्वारे उमेदवारांना कळविण्यात येईल, अशी माहिती देण्यात आली आहे.

दरम्यान पाऊस सुरूच राहिल्यास मात्र पोलीस भरती प्रक्रिया पुढे जाण्याची शक्यता पोलीस वर्तुळात वर्तविण्यात येत आहे.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

अग्निशमन विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडील रेडीओ ट्रंकींग सिस्टीमची (Non Comprehensive) वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती कामांकरीता निविदा ई टेंडरींग पध्दतीने मागविण्यांत येत आहेत. निविदा महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.२१/०६/२०२४ ते दि.०८/०७/२०२४ या कालावधीत उपलब्ध असतील. सदरच्या निविदा ई टेंडरिंग पध्दतीने दि.०८/०७/२०२४ रोजी १६.०० वाजे पर्यत स्विकारण्यात येतील.सदर निविदा दि.१२/०७/२०२४ रोजी १६.३० वा. निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यांत येईल. निविदा सुचना आणि प्रपत्र ठाणे महानगरपालिकेची अधिकत संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in येथे उपलब्ध आहे. ई टेंडरिंग बाबत अधिक माहितीसाठी अग्निशमन विभाग, ठाणे महानगरपालिका, ठाणे येथे संपर्क साधावा.

ठामपा/पिआरओ/अग्निशमन/८२/२०२४-२५
दि:२०.०६.२०२४

सही/-
मुख्यअग्निशमन अधिकारी
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Pls visit our oficial web-site**
**www.thanecity.gov.in**

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

शहर विकास विभाग,

जाहीर सुचना

(महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये)

ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारीत विकास योजना शासन निर्णय क्र. टिपीएस/1297/1319/सी.आर-148/97/नवि-12, दि. 4 ऑक्टोबर, 1999 अन्वये मंजूर असून, 22 नोव्हेंबर 1999 पासून अंमलात आली. तसेच सुधारीत विकास योजनेतील वगळलेले क्षेत्र (Excluded portion) शासन निर्णय क्र. टिपीएस/1201/ 274/सीआर-28/2009/नवि-12, दि. 3 एप्रिल, 2003 अन्वये मंजूर झाले असून, दि. 14 मे, 2003 पासून योजना अंमलात आली आहे. (यापूढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे.)

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्राकरिता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस (युडीसीपीआर) (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त् नियमावली""असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 ( यापुढे "उक्त् अधिनियम" असे संबोधिले आहे) मधील तरतूदीनुसार शासन अधिसूचना क्र. टिपीएस-1818/प्र.क्र.236/18/वियो. व प्रायो./कलम 37 (1कक) (ग) व कलम 20(4)/नवि-13, दि.02/12/2020 अन्वये मंजूरी दिली असून ती दि.03/12/2020 पासुन अंमलात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त् नियमावलीमध्ये विनियम क्र.10.2 यामध्ये City Specific Regulations अंतर्गत ठाणे महानगरपालिका क्षेत्राकरिता विनियमाबाबत तरतूदी अंतर्भूत करण्यात आलेल्या असून (यापुढे "उक्त् तरतूदी""असे संबोधिले आहे) त्यामध्ये काही विशिष्ट बाबींकरिता नव्याने तरतूद करणेची आवश्यकता आहे.

आणि ज्याअर्थी, ठाणे शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये सेक्टर क्र. 6, मौजे बोरीवडे येथील स.क्र. 20पै., 21पै., 22पै., 23पै, 24पै., 25 ते 28, 30, 31, 32पै, 33पै., 35पै, 37पै, 40पै, 54पै, 55पै, 56, 57, 58पै, 59पै, 60पै, 93पै, व वडवली येथील स.क्र. 17/1 ते 3पै. (गट नं.275पै) आणि मौजे ओवळा स.क्र. 110पै. या भूखंडावर खेळाचे मैदान आरक्षण क्र. 3 दर्शविलेले असून, या आरक्षणाचे एकूण क्षेत्र 84800.00 चौ.मी. आहे. (यापूढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे.)

आणि ज्याअर्थी, ठाणे शहराचा सर्वांगीण विकास करणे व त्याकरीता मुलभूत पायाभूत प्रकल्पांसह शहर सौदर्यीकरण तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उभारण्याच्या दृष्टीने उक्त खेळाच्या मैदान या आरक्षणावर सार्वजनिक क्रिडांगण व अनुषंगीक सुविधा विकसित करण्याकरीता सदरहू भूखंडावर स्पोर्टस् कॉमपलेक्स व कन्व्हेन्शन सेंटर विकसित करण्याची आवश्यकता असल्यामुळे, ठाणे महानगरपालिकेने सदरहू भूखंडावरील मंजूर विकास योजनेमधील उक्त खेळाचे मैदान आरक्षण क्र. 3 मध्ये बदल करुन त्याऐवजी "स्पोर्टस् कॉम्पलेक्स व कन्व्हेन्शन सेंटर" असे आरक्षणात फेरबदल करणे तसेच प्रस्तावित स्पोर्टस् कॉम्पलेक्स व कन्व्हेन्शन सेंटर या आरक्षण विकसनास अनुज्ञेय भूनिर्देशांकाकरीता एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील Chapter-10, City Specific Regulations मध्ये विनियम क्र. 10.2.17 - "For Sports Complex and Convention Centre reservation shall be developed with maximum building potential mentioned under Table 6G and Note mentioned under Table 6G" अशा तरतुदीचा नव्याने समावेश करणेकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये "उक्त मंजुर विकास योजनेत" व "उक्त् अधिनियमातील उक्त् तरतूदीमध्ये" फेरबदलाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित करणेस मा. महासभा ठराव क्र. 31, दि.20/06/2024 अन्वये मान्यता प्राप्त आहे. (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधिले आहे.)

सदर प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 (1) अन्वये मंजूर विकास आराखड्यात व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमध्ये प्रारुप फेरबदलाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | विनियम क्र. | भूखंडाचा तपशील | मंजूर विकास योजना / मंजूर UDCPR मधील तरतुद | प्रारुप फेरबदल |
|---|---|---|---|---|
| 1. | -- | सेक्टर क्र. 6, मौजे बोरीवडे येथील स.क्र. 20पै.,21पै., 22पै.,23पै,24पै.,25 ते 28, 30,31, 32पै, 33पै., 35पै, 37पै, 40पै, 54पै, 55पै, 56, 57, 58पै, 59पै, 60पै, 93पै, व वडवली येथील स.क्र. 17/1 ते 3पै. (गट नं.275पै) आणि मौजे ओवळा स.क्र. 110पै | खेळाचे मैदान आरक्षण क्र. 3 | स्पोर्टस कॉम्पलेक्स व कन्व्हेन्शन सेंटर |
| 2. | 10.2.17 | -- | नव्याने तरतुद | Sports Complex and Convention Centre reservation shall be developed with maximum building potential mentioned under Table 6G and Note mentioned under Table 6G |

## निरंजन डावखरे यांच्याकडून कोकणातील युवाशक्तीसाठी कार्य



### ■ माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांचे मत

भिवंडी – कोकणासह ठाणे जिल्ह्यातील युवाशक्तीसाठी आमदार निरंजन डावखरे यांनी कार्य केले आहे. कोकणासह ठाणे जिल्ह्यातील सर्व स्तरांतील प्रश्न मांडून ते सोडविणाऱ्या महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांना पहिल्या पसंतीचे मत देऊन विजयी करावे, असे आवाहन माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल मोरेश्वर पाटील यांनी आज येथे केले. कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपासह महायुतीचे उमेदवार निरंजन डावखरे यांच्या प्रचारासाठी भिवंडी शहरातील ओसवाल हॉलमध्ये कार्यकर्ता संवाद मेळावा आज उत्साहात पार पडला. या मेळाव्यात माजी राज्यमंत्री कपिल पाटील यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून आमदार निरंजन डावखरे यांना पुन्हा विजयी करण्याचे आवाहन केले. या वेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य देवेश पाटील, भाजपाचे तालुकाध्यक्ष पी. के. म्हात्रे, सौ. नीलिमा डावखरे, लोकसभा समन्वयक जितेंद्र डाकी, हरिश्चंद्र भोईर, रामनाथ पाटील, यशवंत सोरे, छत्रपती पाटील आदी व्यासपीठावर उपस्थित होते. कोकणातील पाच जिल्ह्यात पसरलेल्या पदवीधर मतदारसंघाचे प्रश्न आमदार निरंजन डावखरे यांनी सातत्याने मांडले. कोकणातील युवा शक्तीच्या प्रगतीसाठी ते कार्य करीत होते. पदवीधर, शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी, स्पर्धा परीक्षा देणाऱ्या तरुणांचे प्रश्न मांडण्याबरोबरच सामान्य नागरिकांच्या सुविधांसाठी प्रयत्न केले. त्यांना विकासकार्य करण्याची संधी पुन्हा देण्यासाठी महायुतीच्या कार्यकर्त्यांनी झटावे, असे आवाहन माजी राज्यमंत्री कपिल पाटील यांनी केले. भिवंडी शहरात ३०९६ व भिवंडी ग्रामीणमधील ३ हजार २४१ मतदारांपर्यंत कार्यकर्त्यांनी थेट संपर्क साधावा, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाला देशवासियांनी पसंती दिल्याने पुन्हा 'एनडीए' चे सरकार स्थापन झाले. केंद्र सरकारकडून भातपिकासह विविध पिकांच्या आधारभूत किंमती वाढविण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सरकारकडून विविध लोकोपयोगी निर्णय घेतले गेले. देशातील आरोग्य व्यवस्था सक्षम केली जात असतानाच, महाराष्ट्र सरकारनेही काल पांढऱ्या रेशनकार्ड धारकांनाही मोफत उपचार लागू केले. राज्य सरकारमध्ये शिक्षकांसह विविध पदांच्या रिक्त झालेल्या जागा भरण्यासाठी प्रक्रिया सुरू झाली आहे. राज्याच्या जनतेच्या हिताचे निर्णय महायुतीच घेऊ शकते, असे नमूद करून श्री. कपिल पाटील यांनी भिवंडी शहर व भिवंडी ग्रामीण भागातील प्रत्येक पदवीधर मतदारापर्यंत संपर्क साधण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले.

## हिंदुस्तान पेट्रोलियम

■ पद
१ मेकॅनिकल इंजिनिअर
२ इलेक्ट्रिकल इंजिनिअर
३ इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअर
४ सिव्हिल इंजिनिअर
५ केमिकल इंजिनिअर
६ सिनियर ऑफिसर (CGD)
७ सिनियर ऑफिसर (CGD) Projects
८ सिनियर ऑफिसर/असिस्टंट मॅनेजर (Non-Fuel Business)
९ सिनियर मॅनेजर (Non-Fuel Business)
१० मॅनेजर (Technical)
११ मॅनेजर (Sales- RD Product Commercialisation)
१२ डेप्युटी जनरल मॅनेजर (Catalyst Business Development)
१३ चार्टर्ड अकाउंटेंट (CA)
१४ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर
१५ IS ऑफिसर
१६ IS सिक्योरिटी ऑफिसर- Cyber Security Specialist
१७ क्वालिटी कंट्रोल (QC) ऑफिसर

■ शैक्षणिक पात्रता: UR/OBC/EWS: ६०% गुण, SC/ST/PWD:५०% गुण
पद क्र.१: मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.२: इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.३: इन्स्ट्रुमेंटेशन इंजिनिअरिंग पदवी
पद क्र.४: सिव्हिल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.५: केमिकल इंजिनिअरिंग पदवी.
पद क्र.६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Civil) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.८: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ०२/०५ वर्षे अनुभव
पद क्र.९: (i) MBA/PGDM² (ii) इंजिनिअरिंग पदवी (Mechanical/ Electrical/ Instrumentation/ Chemical/ Civil) (iii) ११ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) इंजिनिअरिंग पदवी (Chemical/ Polymer /Plastics Engineering) (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.११: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) ०९ वर्षे अनुभव
पद क्र.१२: (i) केमिकल इंजिनिअरिंग पदवी (ii) १८ वर्षे अनुभव
पद क्र.१३: CA
पद क्र.१४: (i) M.Sc. (Chemistry (-nalytical/ Physical / Organic/Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव
पद क्र.१५: (i) B.Tech. (Computer Science/ IT Engineering) / MCA किंवा डाटा सायन्स पदव्युत्तर पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१६: (i) इंजिनिअरिंग पदवी (Computer Science/ Information Technology/ Electronics Communications Engineering/ Information Security)/ MCA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.१७: (i) M.Sc. (Chemistry-Analytical / Physical / Organic/ Inorganic) (ii) ०३ वर्षे अनुभव

■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१ ते ५: २५ वर्षांपर्यंत
पद क्र.६ ७: २८ वर्षांपर्यंत
पद क्र.८: २९/३२ वर्षांपर्यंत
पद क्र.९: ३८ वर्षांपर्यंत
पद क्र.१०: ३४ वर्षांपर्यंत
पद क्र.११: ३६ वर्षांपर्यंत
पद क्र.१२: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.१३: २७ वर्षांपर्यंत
पद क्र.१४ १७: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.१५: २९ वर्षांपर्यंत
पद क्र.१६: ४५ वर्षांपर्यंत
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ Fee: General/OBC-NC/EWS: ११८०/- SC/ST/PWD: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ वेबसाईट: https://www.hindustanpetroleum.com/

## न्यूक्लियर पावर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

पदाचे नाव :
१ असिस्टंट ग्रेड-१ (HR)
२ असिस्टंट ग्रेड-१ (FA)
३ असिस्टंट ग्रेड-१ (CMM²)
■ शैक्षणिक पात्रता (पद क्र.१ ते ३): ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी.
■ वयाची अट: २५ जून २०२४ रोजी २१ ते २८ वर्षे SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ Fee: General/OBC/EWS: १००/- SC/ST/PwBD/DODPKI-/महिला: फी नाही
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २५ जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.npcil.nic.in/Content/Hindi/index.aspx

## दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित संत ज्ञानेश्वरांची 'मुक्ताई' यादिवशी भेटीला

महाराष्ट्राच्या आध्यात्मिक पायाभरणीत वारकरी संप्रदायाचा महत्त्वाचा वाटा आहे. वारकरी संप्रदायात संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानदेव, संत सोपानकाका, संत मुक्ताबाई यांना विरक्ती, ज्ञान, भक्ती आणि मुक्ती यांचे मूर्तीमंत स्वरूप मानले जाते. पण, हे दिव्यत्व जगाला समर्पित करून माता-पित्याला देहदंड स्वीकारावा लागला. मातापित्याच्या देहत्यागानंतर हे अनन्यसाधारण कुटुंब सांभाळण्याची नाजूक जबाबदारी मुक्ताबाईंवर पडली. तिने आईच्या निसर्गदत्त भावनेने ती पेलली. आपल्या भावंडांची जणू ती माऊलीच झाली. पुढे मुक्ताई १४०० वर्षाच्या चांगदेवांची अध्यात्मिक गुरु बनली. मुक्ताबाईंचे साधे पण अर्थपूर्ण विचार आपल्याला आजही विचार करायला भाग पाडतात आणि स्त्री मुक्तीची वेगळीच जाणीव निर्माण करत प्रेरणाही देतात. अशा संत मुक्ताबाईंचे आणि त्यांच्या कुटुंबाचे प्रेरणादायी चरित्र उलगडून दाखवणारा दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा भव्य मराठी चित्रपट २ ऑगस्टला आपल्या भेटीला येतोय. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाची घोषणा झाल्यापासून अलौकिक भावंडांच्या भूमिकेत नेमकं कोण असणार? याविषयीची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एका पोस्टरमधून लहानपणीच्या 'मुक्ताई' आणि 'ज्ञानेश्वर' यांची चैतन्यमय झलक पहायला मिळते आहे. प्रदर्शित झालेल्या पोस्टर मध्ये आपल्याला संत ज्ञानेश्वरांच्या भूमिकेत मानस बेडेकर आणि गोडुल्या मुक्ताच्या भूमिकेत चिमुकली ईश्मिता जोशी दिसत आहे.

मुक्ताई आणि ज्ञानेश्वर यांचे नाते विलक्षण होते. मुक्ताई ज्ञानेश्वरांची कधी माता बनायची, कधी बहीण, तर कधी शिष्या बनायची. ज्ञानेश्वरांना गुरु मानून मुक्ताईने त्यांच्याकडून ज्ञान आत्मसात केले. प्रसंगी तिने ज्ञानेश्वरांना उपदेशही केला. संत मुक्ताईच्या मुक्तपणाचे आणि श्रेष्ठपणाचे संतश्रेष्ठींनी 'मुक्तपणे मुक्त, श्रेष्ठपणे श्रेष्ठ, सर्वत्रा वरिष्ठ आदिशक्ती मुक्ताई।।' असे वर्णन केले आहे. मुक्ताईचे छोटेसे जीवन अत्यंत तेजोमय, प्रखर ज्ञानचेतनेचे सिद्ध जीवन होते. छोट्या आयुष्यात या जगन्मायेने संत कवयित्रींच्या काव्यानुभवांचा पाया रचला. स्त्रियांना अध्यात्माचे क्षेत्र खुले करून देऊन त्यात स्त्री-कर्तृत्वाचा आदर्श उभा केला. 'मुक्ताई'ने निभावलेल्या माता, भगिनी, गुरु अशा विविध भूमिकांचे पदर 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' चित्रपटातून उलगडणार आहेत. संगीत अवधूत गांधी, देवदत्त बाजी यांचे असून छायांकन संदीप शिंदे तर संकलन सागर शिंदे, विनय शिंदे यांचे आहे. कलादिग्दर्शन प्रतीक रेडीज तर ड्रोन आणि स्थिर छायाचित्रे प्रथमेश अवसरे यांचे आहेत. रंगभूषा अतुल मस्के, वेशभूषा सौरभ कांबळे यांची आहे. नृत्यदिग्दर्शन किरण बोरकर तर ध्वनीसंयोजन निखिल लांजेकर यांचे आहे.

## इंदिरा गांधी अणुसंशोधन केंद्र

■ पदाचे नाव :
१ सायंटिफिक ऑफिसर/E
२ सायंटिफिक ऑफिसर/D
३ सायंटिफिक ऑफिसर/C
४ टेक्निकल ऑफिसर
५ सायंटिफिक असिस्टंट/C
६ नर्स/-
७ सायंटिफिक असिस्टंट/B
८ फार्मासिस्ट
९ टेक्निशियन
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: (i) M.B.B.S. (ii) M.S./ M.D. (iii) ०४ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) MBBS (ii) M.D.S./ B.D.S./M.D./M.S. (iii) ०३/०५ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) M.B.B.S. (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.४: ५०% गुणांसह फिजिओथेरपी P.G.पदवी
पद क्र.५: ५०% गुणांसह MSW
पद क्र.६: B.Sc.(Nursing) किंवा १२वी उत्तीर्ण + -NM²
पद क्र.७: ६०% गुणांसह B.Sc. (Medical Lab Technology) किंवा ६०% गुणांसह PG DMLT किंवा B.Sc. (Radiography) किंवा ५०% गुणांसह B.Sc. + रेडिओग्राफी डिप्लोमा किंवा ६०% गुणांसह B.Sc. (Nuclear Medicine Technology) + ५०% गुणांसह B.Sc. + DMRIT/ DNMT/DFIT
पद क्र.८: (i) १२वी उत्तीर्ण (ii) फार्मसी डिप्लोमा
पद क्र.९: (i) ६०% गुणांसह १२वी उत्तीर्ण (Science). (ii) Plaster / Orthopaedic Technician/ ECG Technician/ Cardio Sonography / Echo Technician प्रमाणपत्र
■ वयाची अट: ३० जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते ५० वर्षे
पद क्र.२: १८ ते ४० वर्षे
पद क्र.३ ते ७: १८ ते ३५ वर्षे
पद क्र.८ ९: १८ ते २५ वर्षे
■ वय गणकयंत्र: वय मोजा
■ नोकरी ठिकाण: कल्पाक्कम (तमिळनाडु)
■ फी : SC/ST/महिला: फी नाही
पद क्र.१ ते ३: ३००/-
पद क्र.४ ते ६: २००/-
पद क्र.८ ९: १००/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: ३० जून २०२४
■ अधिकृत वेबसाईट: https://www.igcar.gov.in/

## आयबीपीएस भरती

■ जागा : ९९९५ जागा
■ पदाचे नाव:
१ ऑफिस असिस्टंट (Multipurpose)
२ ऑफिसर स्केल-I
३ ऑफिसर स्केल-II (General Banking Officer)
४ ऑफिसर स्केल-II (IT)
५ ऑफिसर स्केल-II (C-)
६ ऑफिसर स्केल-II (Law)
७ ऑफिसर स्केल-II (Treasury Manager)
८ ऑफिसर स्केल-II (Marketing Officer)
९ ऑफिसर स्केल-II (-griculture Officer)
१० ऑफिसर स्केल-III
■ शैक्षणिक पात्रता:
पद क्र.१: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.२: कोणत्याही शाखेतील पदवी.
पद क्र.३: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) ५०% गुणांसह पदवी (Electronics/ Communication/Computer Science/ Information Technology) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.५: (i) CA (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.६: (i) ५०% गुणांसह विधी पदवी (LLB) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.७: (i) CA/MBA (Finance) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.८: (i) MBA (Marketing) (ii) ०१ वर्ष अनुभव
पद क्र.९: (i) ५०% गुणांसह पदवी (Agriculture/ Horticulture/ Dairy/ Animal Husbandry/ Forestry/ Veterinary Science/ Agricultural Engineering/ Pisciculture) (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.१०: (i) ५०% गुणांसह कोणत्याही शाखेतील पदवी. (ii) ०५ वर्षे अनुभव
वयाची अट: ०१ जून २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट
पद क्र.१: १८ ते २८ वर्षे
पद क्र.२: १८ ते ३० वर्षे
पद क्र.३ ते ९: २१ ते ३२ वर्षे
पद क्र.१०: २१ ते ४० वर्षे
■ नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
■ फी :
पद क्र.१: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD/ExSM²: १७५/-
पद क्र.२ ते १०: General/OBC: ८५०/- SC/ST/PWD: १७५/-
■ अर्ज करण्याची शेवटची तारीख: २७ जून २०२४
■ परीक्षा:
पूर्व परीक्षा: ऑगस्ट २०२४
एकल/मुख्य परीक्षा: सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४
■ अर्ज
पद क्र.१: https://ibpsonline.ibps.in/rrb13oamay24/
पद क्र.२ ते १०: https://ibpsonline.ibps.in/rrbxiiimay24/

# मधुमेही व्यक्तीने बटाटा खाणे सोडावे का?

### रक्तातील साखरेची पातळी न वाढवता बटाट्याचे सेवन कसे करावे? तज्ज्ञांनी केला खुलासा

रक्तातील साखरेच्या नियंत्रणासाठी कार्बोहायड्रेटचे सेवन नियंत्रित करणे महत्वाचे आहे आणि बटाट्यामध्ये कार्बोहायड्रेट भरपूर प्रमाणात असतात. माझे सर्व रुग्ण मला विचारतात की, 'बटाटे खाणे सोडले पाहिजे का?' मधुमेह असलेल्या बहुतेक लोकांसाठी बटाटे पूर्णपणे काढून टाकणे आवश्यक नाही, जर ते संतुलित आहाराचा भाग असतील तर. तुम्ही बटाट्याचे किती प्रमाणात सेवन करत आहात आणि कशा पद्धतीने तो तयार करत आहात याकडे लक्ष देऊन, मध्यम प्रमाणात त्याचे सेवन करू शकता, असे डॉ. ऋचा चतुर्वेदी यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना सांगितले. इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सच्या एंडोक्राइनोलॉजिस्ट विभागात त्या काम करतात. डॉ. ऋचा चतुर्वेदी यांनी आपले रोजचे जेवण संतुलित कसे करावे आणि कॅलरीज कसे मोजावे, याबाबत सविस्तर माहिती दिली आहे.

### बटाट्यांचे सेवन करताना कॅलरीज संतुलित कसे करावे?

बटाट्यामध्ये कार्बोहायड्रेट्स जास्त असतात आणि मॅक्रोन्यूट्रिएंटयुक्त दैनंदिन आहारात त्याचा समावेश केला पाहिजे. उदाहरणार्थ, एका मध्यम बटाट्यामध्ये (सुमारे १५० ग्रॅम) अंदाजे ३० ग्रॅम कर्बोदके असतात. बटाट्यांची कॅलरी घटक त्यांच्या प्रकार आणि तयारी पद्धतीनुसार बदलते. एका मध्यम भाजलेल्या बटाट्यामध्ये सुमारे ११० कॅलरीज असतात, तर अर्धा कप मॅश केलेले बटाटे दूध आणि लोणी वापरून बनवल्यास त्यात सुमारे १५० कॅलरीज असू शकतात.

किती प्रमाणात बटाटा खात आहात याकडे लक्ष द्या. बटाट्याचे सेवन करण्याचे सामान्य प्रमाण म्हणजे अर्धा कप मॅश केलेले बटाटे किंवा लहान भाजलेले बटाटे, ज्यामध्ये अंदाजे १५ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स असतात.

### तयारी पद्धत महत्त्वाची का आहे

बटाटे त्यांच्या सालीसह भाजल्यास किंवा उकडल्याने पोषक आणि फायबर टिकून राहण्यास मदत होते. लोणी, मलई आणि उच्च-कॅलरी टॉपिंग्सचा वापर कमी करणे आवश्यक आहे. त्याऐवजी औषधी वनस्पती, मसाले किंवा थोड्या प्रमाणात ऑलिव्ह ऑइल वापरून त्याची चव वाढवा. पिष्टमय पदार्थ नसलेल्या भाज्या आणि पातळ प्रथिनांचा स्रोत असलेले बटाटे एकत्र केल्यास पचनक्रिया मंदावते आणि रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होते. उदाहरणार्थ, सॅलेड आणि ग्रील्ड चिकनबरोबर एक छोटासा भाजलेला बटाटा खाल्ल्यास आपले जेवण संतुलित आणि समाधानकारक बनवते.

### तिन्ही जेवणात बटाट्यांमधून कॅलरी कसे संतुलित करावे

नाश्ता : नाश्त्यासाठी बटाट्यांचे एक सामान्य प्रमाण, सुमारे अर्धा कप कापलेला, उकडलेला बटाटा असू शकतो, ज्यामध्ये सुमारे १५ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स आणि अंदाजे ७० कॅलरीज असतात. पालक किंवा भोपळी मिरची यांसारख्या उच्च फायबर भाज्यांसह बटाट्याची भाजी तयार करा आणि उकडलेली अंडी किंवा कमी फॅट्सयुक्त चीजसारख्या प्रथिने स्त्रोतांसह ती सेवन करू शकता.

**दुपारचे जेवण :** एक लहान भाजलेला बटाटा हा चांगला पर्याय आहे. यामध्ये अंदाजे १५ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स आणि ११० कॅलरीज असतात. स्टार्च नसलेल्या भाज्यांपासून (जसे की लेट्यूस, काकडी आणि टोमॅटो) बनवलेली कोशिंबीर आणि ग्रील्ड चिकन किंवा टोफूसारख्या प्रथिने स्त्रोतासह सेवन करा. एक चमचा ऑलिव्ह ऑइल वापरून थोड्या प्रमाणात निरोगी फॅट्सह खाऊ शकता, जे तुमचे जेवण संतुलित करण्यास मदत करू शकते.

**रात्रीचे जेवण :** कमीत कमी बटर आणि स्किम मिल्क (स्निग्धांश विरहित दूध) वापरून अर्धा कप मॅश केलेले बटाटे खाऊ शकता. यामध्ये सुमारे १५ ग्रॅम कार्बोहायड्रेट्स आणि सुमारे ८०-१०० कॅलरीज असतात. वाफवलेल्या नॉन-स्टार्च भाज्या (जसे की ब्रोकोली किंवा हिरव्या बीन्स) आणि मासे यांसारख्या प्रथिनांच्या स्त्रोतांसह सेवन करू शकता. अतिरिक्त कॅलरी न जोडता चव वाढवण्यासाठी उच्च-कॅलरी टॉपिंग्जऐवजी औषधी वनस्पती आणि मसाल्यांचा वापर करा.

रताळ्याचा ग्लायसेमिक इंडेक्स रक्तातील साखर किती लवकर वाढते याचे मोजमाप) तुलनेने कमी असतो. रताळे बहुतेक वेळा त्यांच्या कमी ग्लायसेमिक इंडेक्समुळे आहारात समाविष्ट केले जातात आणि त्यात फायबर, जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स जास्त असतात. नवीन बटाटे पूर्ण परिपक्क होण्यापूर्वी कापणी केली जातात आणि परिपक्क बटाट्यांच्या तुलनेत कमी ग्लायसेमिक निर्देशांक असतो.

### साखर-मुक्त बटाटे खाऊ नका

साखर-मुक्त बटाटे ही दिशाभूल करणारी संज्ञा आहे. कारण सर्व बटाट्यांमध्ये मूळतः कार्बोहायड्रेट्स असतात, जे शरीरात साखरेत रूपांतरित होतात. या शब्दाचा अर्थ असा आहे की, बटाट्यांवर रसायनाने अशा प्रकारे फवारणी करणे की, त्यात असलेल्या स्टार्चचे साखरेत रूपांतर होणार नाही. त्यामुळे त्यांची चव गोड नसते, पण त्यात स्टार्च असतो.

# अमेरिका जिंकता जिंकता हरली

### अँड्रियस गौसची झुंज अपयशी

भेदक गोलंदाजीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने अखेरीस अमेरिकेवर विजय मिळवलाच. विस्फोटक फलंदाजी, कमालीचं क्षेत्ररक्षण आणि चांगली गोलंदाजी या तिन्ही विभागातील शानदार कामगिरीसह अमेरिकेने आफ्रिकेला सहज विजय मिळवू दिला नाही. हरमीत सिंग आणि अँड्र्यू गोसच्या भागीदारीने आफ्रिकेला घाम फोडला पण संघाने अखेरीस १८ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजी करत दक्षिण आफ्रिकेने क्विंटन डीकॉकच्या ७४ धावा आणि मारक्रमच्या ४६ धावांसह ४ बाद १९४ धावांचा डोंगर उभारला. अमेरिकेने कडवी झुंज देत या लक्ष्याचा पाठलाग करताना ६ बाद १७६ धावा करू शकले. अँड्रियस गौसने विस्फोटक फलंदाजी करत संघासाठी ४७ चेंडूत ५षटकार आणि ५ चौकारांसह ८० धावांची खेळी केली, पण संघाला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. कगिसो रबाडाच्या भेदक गोलंदाजीसमोर आणि हरमीत सिंगच्या विकेटनंतर सामना पलटला आणि अमेरिकेला पराभव पत्करावा लागला. धावांचा पाठलाग करताना अमेरिकेच्या सर्वच फलंदाजांनी पुन्हा एकदा मन जिंकणारी कामगिरी केली. दक्षिण आफ्रिकेच्या वतीने १९६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या अमेरिका संघाने उत्कृष्ट फलंदाजी केली. अमेरिकेच्या डावाच्या १८ व्या षटकापर्यंत, हा सामना जिंकून पुन्हा एकदा मोठा अपसेट काढू शकेल असे वाटत होते. पण १९ व्या षटकात आफ्रिकेने कमबॅक करत विजय मिळवला.

अमेरिकेच्या पराभवाचा टर्निंग पॉईंट काय ठरला?

१९व्या षटकात कागिसो रबाडाने सामना फिरवला. या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर त्याने शानदार फलंदाजी करणाऱ्या हरमीत सिंगची विकेट घेतली. २१ चेंडूत ३८ धावांवर खेळत असलेल्या हरमीतने मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र तो सीमारेषेवर झेलबाद झाला. हरमीतच्या विकेटनंतर अमेरिकेच्या संघाला मोठे फटके खेळण्याची संधी मिळाली नाही. या षटकात रबाडाने केवळ २ धावा दिल्या. त्यामुळे हा सामना दक्षिण आफ्रिकेच्या पूर्णपणे बाजूने फिरला.

**दक्षिण आफ्रिकेने विजयासह रचला इतिहास**

टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात दक्षिण आफ्रिकेच्या संघाने सलग पाच सामने जिंकण्याची ही पहिलीच वेळ आहे. गट टप्प्यातील सलग चार सामने जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने सुपर-८ मधील पहिला सामना जिंकून सलग पाचव्या विजयाची नोंद केली. क्विंटन डी कॉकला त्याच्या स्फोटक खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कार मिळाला.

दक्षिण आफ्रिकेने दिलेल्या १९५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिका संघाने ७१ धावांत चार विकेट गमावल्या. यामध्ये स्टीव्हन टेलर (२४), नितीश कुमार (८), कर्णधार आरोन जोन्स (०) आणि कोरी अँडरसन (१२) यांच्या विकेट्सचा समावेश आहे. कर्णधार ॲरोन जोन्स खातेही न उगडता बाद झाला, ज्याचा संघाला मोठ फटका बसला. कारण जोन्स यंदाच्या विश्वचषकात अमेरिकेसाठी सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. मात्र, यानंतर अँड्रियस गौस (नाबाद ८०) आणि हरमीत सिंग (३८) यांनी सहाव्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी करत संघाला सामन्यात कायम ठेवले.

अखेरच्या दोन षटकात अमेरिकेला विजयासाठी २८ धावांची गरज होती. पण १९व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर हरमीत झेलबाद झाला आणि त्यानंतर अमेरिकेचा संघ मागे पडला. त्यानंतर विजयासाठी शेवटच्या षटकात त्यांना २६ धावा करायच्या होत्या, मात्र संपूर्ण २० षटके खेळून संघाला ६ विकेट्सवर केवळ १७६ धावा करता आल्या.

दक्षिण आफ्रिकेकडून रबाडाने चार षटकांत १८ धावा देत तीन विकेट घेतले. त्यांच्याशिवाय केशव महाराज, एनरिक नॉर्किया आणि तबरेझ शम्सी यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

सलामीवीर क्विंटन डी कॉकचे (७४ धावा) विस्फोटक अर्धशतक आणि कर्णधार एडन मारक्रमच्या दुसऱ्या विकेटसाठी ६० चेंडूत केलेल्या ११० धावांच्या भागीदारीच्या जोरावर दक्षिण आफ्रिकेने मोठी धावसंख्या उभारली चार बाद १९४ धावांची आव्हानात्मक धावसंख्या उभारत अमेरिकेला मोठे आव्हान दिले. डी कॉकने संथ आणि फिरकीपटूंसाठी योग्य समजल्या जाणाऱ्या खेळपट्टीवर अमेरिकन गोलंदाजांचा धुव्वा उडवला आणि ४० चेंडूंच्या डावात सात चौकार आणि पाच षटकार मारून स्पर्धेतील पहिले अर्धशतक झळकावले. सलामीवीर डिकॉकशिवाय मारक्रमने ४६ धावा केल्या तर हेनरिक क्लासेनने नाबाद ३६ आणि ट्रिस्टन स्टब्सने नाबाद २० धावा केल्या आणि पाचव्या विकेटसाठी ५३ धावांची नाबाद भागीदारी केली. अमेरिकेकडून सौरभ नेत्रावळकर आणि हरमीत सिंग यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.



## साचलेल्या पाण्यावर मखमली हिरवी चादर


छाया : अशोक घाग

कल्याणमध्ये शिळफाटा रस्त्यावर

# मतदान ओळखपत्रांचा ढीग

कल्याण : कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील टाटा पॉवर नाका येथील पिसवली गाव हद्दीत बुधवारी एका पोतळीमध्ये भरलेली हजारो मतदारांची ओळखपत्रे रस्त्यावर फेकलेली आढळून आली आहेत. बहुतांशी मतदार ओळखपत्रे कल्याण पूर्व भागातील नेतिवली, पिसवली, चक्कीनाका भागातील रहिवाशांची असल्याचे समजते.



मानपाडा पोलिसांनी ही ओळखपत्रे ताब्यात घेऊन या मतदान ओळखपत्रांची सत्यता, ही ओळखपत्रे रस्त्यावर कोणी आणून फेकली. अलीकडे पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत या मतदार ओळखपत्रांचा वापर झाला आहे का या दिशेने तपास सुरु केला आहे. कल्याण पूर्वेतील कल्याण-शिळफाटा रस्त्याजवळील पिसवली गावाच्या प्रवेशद्वारावरील कमानीजवळ एक वस्तूने भरलेली पिशवी बुधवारी पडली असल्याचे नागरिकांना दिसले. सुरुवातीला शिळफाटा रस्त्यावरून धावणाऱ्या एखाद्या वाहनातून ही पिशवी पडली असल्याचे पादचाऱ्यांना वाटले. परंतु, एका पादचाऱ्याने या पिशवीत काय आहे हे पाहण्यासाठी ती पिशवी उघडली. त्यामध्ये निवडणूक मतदान ओळखपत्रे दिसली. ही ओळखपत्रे फेकण्यात काहीतरी गडबड दिसते, त्यामुळे संबंधित पादचारी तेथून निघून गेला.

■ आताच निवडणुका पार पडल्या आहेत. ही मतदान ओळखपत्रे बनावट निघाली तर आपल्याला नाहक चौकशीला सामोरे जावे लागेल, या भीतीने कोणीही नागरिक या मतदान ओळखपत्रांच्या पिशवीजवळ गेला नाही. काही नागरिकांनी ही माहिती मानपाडा पोलिसांना दिली. पोलिसांनी रस्त्यावर पडलेली ओळखपत्रे जमा केली. ती पोतडीसह जप्त केली. या पोतडीवरील शिक्क्याच्या अनुषंगाने पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

■ कल्याण पूर्व भागातील बहुतांशी रहिवासी हा उत्तर भाषिक आहे. लोकसभा निवडणूक काळात हा वर्ग आपल्या मूळ राज्यात गेला होता. त्यामुळे मतदार असलेल्या या रहिवाशांच्या नावे बनावट मतदार ओळखपत्र तयार करून लोकसभा निवडणुकीत त्याचा वापर केला गेला आहे का, असा संशय जागरूक नागरिक, काही राजकीय मंडळींकडून व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची पोलिसांनी सखोल चौकशी करण्याची मागणी पुढे येत आहे.

साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या

## कर्ज योजनांसाठी संकेतस्थळावर अर्ज भरा

ठाणे : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत दारिद्र्य रेषेखालील बेरोजगारांकरिता विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी www.lokshahir.in हे संकेतस्थळ सुरू करण्यात आले आहे. अनुसूचित जातीतील युवकांनी या संकेतस्थळावर जाऊन विविध कर्ज योजनांसाठी अर्ज करावे, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक वंदना राणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीतील मातंग समाज व त्यातील १२ पोटजाती - मांग, मातंग, मिनी मादिंग, मादिग, दानखणी मांग, मांग महाशी, मदारी, राधेमांग, मांग-गारुडी, मांग-गारोडी, मादगी, मादिगा या पोटजातीतील १८ ते ५० या वयोगटातील दारिद्र्य रेषेखालील (वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. ३,००,०००/-) बेरोजगारांकरिता साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत विविध कर्ज योजना राबविण्यात येतात. महामंडळामार्फत थेट कर्ज योजना (कर्ज मर्यादा रु.१.०० लाख) तसेच केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या पीएम एजेएवाय योजनांचे कर्ज प्रस्ताव/अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी पोर्टल विकसित करण्यात आले असून www.lokshahir.in अशी आहे. या सुविधेचा ठाणे जिल्ह्यातील मांतग समाजातील शहरी / ग्रामीण भागातील इच्छुक / पात्र व्यक्तीने जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

नाले तुंबून नागरिकांच्या घरात पाणी दिवा प्रभाग समिती

## सहाय्यक आयुक्त अक्षय गुड्डे यांच्यावर निलंबनाची कारवाई करा : रोहिदास मुंडे

**दिवा : दिव्यात नालेसफाईची कामे पूर्ण क्षमतेने झालेली नाहीत.पावसाळ्यात नालेसफाई पूर्ण क्षमतेने न झाल्यामुळे नागरिकांच्या बैठ्या घरांमध्ये पाणी शिरून घरातील वस्तूंचे अतोनात नुकसान झालेले आहे दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त यांना जबाबदार धरून निलंबित करावे अशी मागणी ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी केली आहे.**

दिवा प्रभाग समितीचे प्रमुख अधिकारी म्हणून सहाय्यक आयुक्त हे कमी पडत असून दिवा शहराचा संपूर्ण पाहणी दौरा त्यांनी पावसाळ्या आधी करणे अपेक्षित होते. अनेक ठिकाणी नाल्यातील पूर्ण गाळ काढला गेलेला नाही. वरच्या प्लास्टिकच्या पिशव्या काढण्यात आलेल्या आहेत. नाले पूर्ण क्षमतेने साफ न केले गेल्यानेगणेश नगर,विकास म्हात्रे गेट, बेडेकर नगर,डी जी कॉम्प्लेक्स, येथे पाणी नागरिकांच्या घरात घुसले आहे. दरवर्षी हा प्रकार पावसाळ्यात दिव्यात पाहायला मिळतो.मागील घडलेल्या घटनांवरून दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्त धडा घेणार नसतील तर कामचुकार अधिकाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे अशी रोखठोक भूमिका ठाकरेंच्या शिवसेनेचे दिवा शहर संघटक रोहिदास मुंडे यांनी घेतली आहे. दिवा शहरात पालिका प्रशासनाचे



प्रमुख म्हणून सहाय्यक आयुक्त नीट जबाबदारी पार पाडणार नसतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे गरजेचे आहे. यामुळे प्रशासनाला शिस्त लागेल आणि दिवा शहराकडे बघण्याचा दृष्टिकोन अधिकाऱ्यांचा बदलेल असेही रोहिदास मुंडे यांनी म्हटल आहे.दिवा शहरात जो गलिच्छपणा व अस्वच्छता अनेक ठिकाणी पाहायला मिळते त्याबाबत सुद्धा सहायक आयुक्तांनी भूमिका घेणे अपेक्षित होते मात्र ठाण्याला एक न्याय आणि दिवा शहराला एक न्याय अशा पद्धतीचे प्रशासन येथे काम करणार असेल तर अशा प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे असेही मुंडे यांनी म्हटले आहे.

## रबाळे परिसरात अडीच तासांत तीन घरफोड्या

नवी मुंबई : रबाळे पोलीस ठाणे अंतर्गत संध्याकाळी चार वीस ते सहा या वेळेत तीन घरांत चोरी करून चोरट्यांनी १ लाख ५८ हजार २५० हजार रुपयांचा ऐवज चोरी केला आहे. यात दागिने आणि रोकडचा समावेश आहे. अवघ्या दोन-अडीच तासांत तीन घरफोड्या करून चोर पसार झाल्याने परिसरात चोरट्यांची दहशत पसरली आहे. गौरव कापडणीस हे रबाळे पोलीस ठाणे अंतर्गत असणाऱ्या अमृतधाम सोसायटी गोठीवली गावात राहतात. १७ तारखेला रात्री ते नेहमीप्रमाणे घरी आले असता त्यांच्या घराचा कडी-कोयंडा तुटलेल्या अवस्थेत होता तसेच आत गेल्यावर सर्व सामान अस्ताव्यस्त पसरल्याचे दिसले. तपासणी केली असता त्यांच्या घरातील दागिने चोरी झाल्याचे निदर्शनास आले. तसेच याच सोसायटीतील अन्य दोन घरांतही चोरी झाल्याचे समोर आले. ही माहिती मिळताच रबाळे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तिन्ही घरांत मिळून १ लाख ५८ हजार २५० हजाराचा ऐवज चोरी झाला आहे. यात दागदागिने आणि रोकडचा समावेश आहे. या प्रकरणी गौरव आणि अन्य दोघांनी रबाळे पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला.

## कल्याण डोंबिवली पालिकेत शिवराज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न






कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत आज शिवराज्याभिषेक दिन उत्साहात संपन्न झाला. कल्याण पश्चिमेतील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास महापालिका उपआयुक्त धैर्यशील जाधव यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महापालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस व आयुक्त दालनातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या समयी शहर अभियंता अनिता परदेशी, मुख्य लेखापरीक्षक लक्ष्मण पाटील, मुख्य लेखा अधिकारी दिग्विजय चव्हाण, उपायुक्त अतुल पाटील, धैर्यशील जाधव, अवधुत तावडे, प्रसाद बोरकर, विभागप्रमुख (माहिती व जनसंपर्क) संजय जाधव, कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, शैलेश कुलकर्णी, प्रशांत भागवत, अशोक घोडे, सहाय्यक आयुक्त प्रिती गाडे, निवेदिता पाटील, तुषार सोनावणे, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे तसेच इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त डोंबिवलीतही परिमंडळ-२ चे उपायुक्त रमेश मिसाळ यांनी मानपाडा रोड वरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी सहा.आयुक्त संजयकुमार कुमावत व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

अक्षयपात्र फाऊंडेशनच्या स्वयंपाकघरास

## पालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिली भेट

ठाणे : ठाणे महापालिका शाळांतील १४ हजार विद्यार्थ्यांना दररोज मध्यान्न पोषण आहार देणाऱ्या अक्षयपात्र फाऊंडेशन या संस्थेच्या पवार नगर येथील स्वयंपाकघरास ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नुकतीच भेट दिली.

स्वयंपाकघराची व्यवस्था, पोषण आहाराचा मेन्यू आणि तेथील व्यवस्थापन यांची माहिती अक्षयपात्र फाऊंडेशन, महाराष्ट्रचे संचालक मनू मेहरोत्रा आणि मुख्य समन्वयक उपेंद्र नारायण दास यांनी दिली. याप्रसंगी, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे आणि उपायुक्त (शिक्षण) सचिन पवार उपस्थित होते.

ठाणे महापालिकेच्या शाळांमध्ये सुमारे २६ हजार विद्यार्थी शिकतात. त्यापैकी, १४ हजार विद्यार्थ्यांना अक्षयपात्रतर्फे तर उर्वरित विद्यार्थ्यांना विविध बचत गटांच्या माध्यमातून शालेय पोषण आहार दिला जातो.

अक्षयपात्र फाऊंडेशनच्या स्वयंपाकघरातील स्वच्छता, तेथील शिस्तबद्ध व्यवस्थापन याबद्दल आयुक्त राव यांनी समाधान व्यक्त केले. तसेच, विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या भोजनाची चवही आयुक्त आणि वरिष्ठ अधिकारी यांनी घेतली.

चिकू फळपिकासाठी फळपिक विमा योजनेत सहभागी होण्याची

## अंतिम मुदत ३० जून : दीपक कुटे

ठाणे : येत्या मृग बहारामध्ये विविध हवामान धोक्यामुळे चिकू फळपिकाचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा, यासाठी कृषि विभागामार्फत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. योजनेमध्ये सहभागाकरिता विमा पोर्टल दि. १५ जूनपासून सुरु झाले असून ३० जून २०२४ पर्यंत सुरु राहणार आहे. जादा आर्द्रता व जास्त पाऊस या हवामान धोक्यापासून संरक्षण करण्यासाठी चिकू उत्पादक शेतकऱ्यांनी निर्धारित केलेल्या कालावधीत फळ पिक विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे यांनी केले आहे.

### योजनेची वैशिष्ट्ये

१. ठाणे जिल्ह्यामध्ये अधिसूचित केलेल्या महसूल मंडळात चिकू पिकाच्या उत्पादनक्षम फळबागांना विमा संरक्षण देण्यात येईल. २. कर्जदार शेतकरी व बिगर कर्जदार शेतकरी यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक असेल. ३. खातेदार शेतकरी व्यतिरिक्त कुळ व भाडेपट्टीने शेती करणारे शेतकरी यांनाही सदर योजना लागू राहील. मात्र भाडेपट्टीने शेती करणारास नोंदणीकृत (रजिस्टर्ड) भाडेकरार पिक विमा संकेतस्थळावर अपलोड करणे बंधनकारक आहे. ४. या योजनेत प्रति शेतकरी सहभागासाठी कोकण विभागाकरीता एका फळपीकाखालील कमीत कमी उत्पादनक्षम क्षेत्र १० गुंठे (०.१० हे) अशी मर्यादा राहील. तसेच जास्तीत जास्त क्षेत्र मर्यादा ही सर्व फळपिके व दोन्ही हंगाम मिळून प्रती शेतकरी ४ हे. मर्यादेपर्यंत राहील. विमा अर्जासोबत फळबागेचा जिओ टॅगिंग (Geo Tagging) असलेला फोटो विमा पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य राहील. ५. एका फळपिकासाठी एका वर्षात एकाच क्षेत्रावर मृग व आंबिया बहारापैकी कोणत्याही एकाच बहाराकरीता विमा संरक्षणासाठी अर्ज करता येईल. ६. सदर फळपीक विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांनी ई - पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. ७. विमा योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी आणि विमा नुकसान भरपाई मिळणेसाठी शेतकऱ्याचे बँक खाते आधार क्रमांकाशी लिंक असावे. ८. फळपिक विमा योजनेअंतर्गत हवामान धोक्याचा ट्रिगर कार्यान्वित झाल्यास त्या महसूल मंडळातील त्या पिकासाठी भाग घेतलेल्या शेतकऱ्यास नुकसान भरपाई रक्कम संबंधित विमा कंपनीकडून देण्यात येणार आहे. ९. विमा संरक्षणाचे केवळ उत्पादनक्षम फळबागांनाच लागू आहे. १०. विहित वयापेक्षा कमी वयाच्या फळबाग लागवडीस विमा संरक्षणाची नोंद झाल्याचे पडताळणीत निदर्शनास आल्यास विमा संरक्षण केव्हाही संपुष्टात येईल आणि शेतकऱ्याने भरलेला विमा हप्ता जप्त होईल. ११. योजनेत भाग घेण्यासाठी चिकू फळपिकाचे उत्पादनक्षम वय ५ वर्षे आहे.

## नवी मुंबईकरांना मिळणार मूलभूत सुविधा

खा. म्हस्के व आयुक्त शिंदे यांच्यासमवेत झालेल्या बैठकीत अनेक प्रश्न मार्गी

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिका, सिडको आणि एमआयडीसी या तिन प्राधिकरणांमध्ये समन्वय राखला जावून मुलभूत नागरी सुविधा तातडीने नवी मुंबईकरांना मिळाव्यात, या उद्देशाने नवनिर्वाचित खासदार नरेश म्हस्के यांनी आज गुरुवार, २० जून २०२४ रोजी नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांची भेट घेत एका बैठकीचे आयोजन केले. बैठकीत विविध प्रश्नांवर चर्चा करत तातडीने त्याची अंमलबजावणी करण्याचे निर्देश खा. नरेश म्हस्के यांनी यावेळी दिले.




शिवसेना उपनेते विजय नाहटा, नवी मुंबई जिल्हाप्रमुख विजय चौगुले आणि नवी मुंबई पालिकेतील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होता.

नवी मुंबई परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याच्या प्रस्तावाला तातडीने गती देण्याचे निर्देश बैठकीच्या प्रारंभीच खा. नरेश म्हस्के यांनी दिले. नवी मुंबईमध्ये शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे साहेब यांचा पुतळा उभारण्यासंदर्भात शिवसेना नवी मुंबई जिल्हाप्रमुख विजय चौगुले यांनी आयुक्तांना बैठकीत निवेदन सादर केले. खासदार नरेश म्हस्के यांनी याविषयी आयुक्तांशी चर्चा करत पुतळा उभारण्याबाबत तातडीने पावले उचलण्याच्या सूचना केल्या.

नवी मुंबईमध्ये सिडकोने उभारलेल्या अति अल्प आणि अत्यल्प उत्पन्न गटातील सोसायटीतील रहिवाशांना नागरी सुविधा मिळतांना अडचणी येत असल्याची बाब रहिवाशांनी खासदारांच्या निदर्शनास आणून दिली. या संदर्भात चर्चा करून या सोसायट्यांमध्ये नागरि सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात असे निर्देश खा. नरेश म्हस्के यांनी आयुक्तांना दिले.

नवी मुंबईतील रहिवासी परिसर आणि शाळा असलेल्या ठिकाणी गतिरोधक नसल्याने कित्येक वेळा अपघाताच्या घटना घडल्या आहेत. ही बाब लक्षात घेऊन अशा ठिकाणी गतिरोधक टाकण्यात यावेत अशी सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी आयुक्तांना केली.

नवी मुंबईतील बालवाडी शिक्षकांना नियमित करण्याचा प्रश्न प्रलंबित आहे, या संदर्भात खासदार नरेश म्हस्के यांनी आयुक्तांशी चर्चा करून पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.

नवी मुंबई मनपा परिवहन सेवा आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनासंदर्भात देखिल आयुक्तांशी चर्चा करून शहरातील नागरिकांना चांगली व दर्जेदार परिवहन सेवा देण्याची सूचना खासदार नरेश म्हस्के यांनी केली.

नवी मुंबईत धोकादायक इमारतींना चांगला एफएसआय मिळतो. याचा फायदा घेऊन काही ठिकाणी दलालांच्या सांगण्यावरुन विनाकारण इमारती धोकादायक ठरवल्या जातात आणि नोटीसा दिल्या जात आहेत. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. तरी महापालिकेने स्वत: सक्षम तांत्रिक सल्लागार नेमून अशा इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे जेणेकरून सर्वसामान्य रहिवाश्यांना दिलासा मिळेल असे खा. म्हस्के यांनी यावेळी सांगितले.

नवी मुंबई मनपा क्षेत्रातील नागरि सुविधा देण्यासंदर्भात, मैदाने, बगिचा उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोकडील जागा महापालिकेकडे हस्तांतरित करणे, गटई कामगारांना व्यवसाय परवाने ताबडतोब देणे, पारसिक झील शेवटच्या टोकापासून परिवहन सेवा सुरू करणे, वाशी-नवी मुंबई गणेशकृपा भाजीपाला मंडई व मच्छीमार्केट येथे सोयीसुविधा पुरविणे, निलगिरी गार्डन ते बेलापूर किल्लापर्यंत अंडरपास तयार करणे आणि त्या ठिकाणी ध्वनीनिरोधक यंत्रणा बसविणे, पाणीपुरवठा सुरळीत करणे, नवी मुंबईतील नवीन कंत्राटी ठेकेदार हे कामगार कामावर ठेवताना जुन्या कामगारांना डावलत असून त्यांना न्याय मिळवून द्यावा, ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या विरंगुळा केंद्रांमधील साहित्य नादुरुस्त झालेली आहेत, ती दुरुस्त करणे, पुनर्विकास योजनेसाठी एक खिडकी योजना राबविणे, स्थानिक भूमीपुत्रांच्या विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्ती दोन महिन्यांत मिळवून देणे अशा विविध सामाजिक प्रश्नांवर आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात आला.



भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांचे वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा आश्विनी पाटील, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, यांच्यासह जिल्ह्यातील पदाधिकारी, हितचिंतक, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

नामवंत व्याख्याते अभिजीत कांबळे यांचे

## ‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी’ विषयावर व्याख्यान

नवी मुंबई : महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रातील विकासात महत्वपूर्ण योगदान असणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात छत्रपती शाहू महाराजांच्या प्रेरणादायी कार्याला उजाळा देण्यासाठी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या २६ मे रोजीच्या १५० व्या जयंती दिनाच्या औचित्याने शनिवार दि. २२ जून २०२४ रोजी, सायं ६.३० वा., वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या तसेच डिजीटल अशा तिन्ही प्रसार माध्यमांमध्ये वीसहून अधिक वर्षांचा पत्रकारितेचा अनुभव असलेले व सध्या बीबीसी मराठीचे संपादकपद भूषविणारे संपादक, व्याख्याते अभिजीत कांबळे यांचे ‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी’ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आलेले आहे.

शिक्षण हेच माणसाच्या प्रगतीचे प्रमुख साधन आहे हे ओळखून छत्रपती शाहू महाराजांनी शिक्षण प्रसारावर विशेष भर दिला. त्यासाठी त्यांनी आपल्या संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत केले. स्त्रियांच्या शिक्षणाकडेही प्राधान्याने लक्ष दिले. शिक्षणाचे महत्व ओळखून त्याकाळी ठोस भूमिका घेत त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या दूरदृष्टीच्या शैक्षणिक विचारांना या निमित्ताने उजाळा मिळणार आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सेक्टर १५, ऐरोली येथे उभारण्यात आलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे बाबासाहेबांच्या ‘ज्ञान हीच शक्ती’ या विचारसूत्रावर आधारित ‘ज्ञानस्मारक’ म्हणून येथे भेट देणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व नागरिकांनी नावाजले आहे. याठिकाणी ‘विचारवेध’ शृंखलेंतर्गत नियमित आयोजित करण्यात येत असलेल्या मान्यवर वक्त्यांच्या व्याख्यानांतून श्रोत्यांना वैचारिक मेजवानी उपलब्ध करुन दिली जात आहे. या व्याख्यानांना नागरिकांचा नेहमीच उत्तम प्रतिसाद लाभलेला आहे.

आधुनिक विज्ञाननिष्ठ समाजक्रांतीचे उद्गाते म्हणून मानांकित राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या सर्वस्पर्शी कार्याला अभिवादन करण्यासाठी व त्यांचे अतुलनीय कार्य जाणून घेण्यासाठी शनिवार, दि. २२ जून २०२४ रोजी, ऐरोली मुलुंड खाडी पुलाजवळ, सेक्टर १५, ऐरोली येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृहात सायं. ६.३० वा. आयोजित करण्यात आलेल्या नामवंत व्याख्याते व संपादक अभिजीत कांबळे यांच्या ‘राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या शैक्षणिक विचारांची दूरदृष्टी’ या व्याख्यानाप्रसंगी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात येत आहे.

‘महाराष्ट्र सम्राट’ हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१